**नि.फौ.ख.क्र.८२/२०२**
**शासन वि गोविंद उर्फ अजित**
**नि.क्र.२३**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव – संकेत सुबोध गांधी
वय – ३८ वर्षे, कामधंदा – नोकरी
सध्या रा- आनंदगृह सोसायटी, सातारा.
मुळ रा. - डोंबिवली, मुंबई.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. आर. सुळ**

मी सध्या पुणे सातारा महामार्गावरील आनेवाडी टोल नाक्यावर कार्यरत आहे. मी तेथे मागील ९ वर्षांपासुन कार्यरत आहे. दिनांक ०८.०४.२०२४ रोजी मी पोलिस ठाणे भुईंज येथे फिर्याद दिली होती. ती फिर्याद आरोपी विरुध्द त्यांनी महामार्गावर ७४९+२०० आर एच एस जवळ अनाधीकृतरित्या दुभाजक सुमारे ८ ते १० मिटर फोडला होता. ते कृत्य आरोपींनी त्यांच्या हॉटेलमध्ये ग्राहकांना महामार्गावरुन मार्ग मिळावा याकरिता केले होते. मी सदरील टोल नाक्यावर रुट ऑपरेशन मॅनेजर आहे. दिनांक ३१.०३.२०२४ रोजी मी व माझे सी.आर.ओ. धीरज अशोक कांबळे महामार्गाची पहाणी करताना आम्हाला आढळले होते की सर्व्हीस रस्त्यावरील आमचे ड्रेनेज चेंबरला रोडवर मार्कींग करुन ठेवले होते. त्यावेळी आम्ही तेथे फोटो देखील काढले होते. तदनंतर दिनांक ०२.०४.२०२४ रोजी आम्हाला असे आढळले की त्या मार्कींग केलेल्या जागेवर रस्ता खोदुन ड्रेनेजच्या पाईप टाकल्या होत्या. त्यावेळी देखील आम्ही फोटो काढले होते.

२. त्यांनतर आमचे वरिष्ठ श्री पी.जे.शर्मा यांना मी सदरील घटनेची फोनद्वारे माहीती दिली. त्यांनी मला अशा सुचना दिल्या की, संबंधीतांना सुचना देवुन रस्ता पुर्ववत करुन घ्यावा. त्यामुळे मी महामार्ग गस्त चमु यांना त्याबाबत माहीती दिली तसेच मोक्यावर असलेल्या कामगारांना देखील रस्ता पुर्ववत करुन देण्याबाबत सक्त निर्देश दिले. तदनंतर दिनांक ०८.०४.२०२२ रोजी पाहणी करताना आम्हाला महामार्गावरील रस्ता दुभाजक फोडलेले दिसले. त्याबाबत मी त्वरीत माझ्या वरिष्ठांना कळवले. त्यामुळे त्यांनी मला लागलीच फिर्याद देण्याच्या सुचना केल्या. आरोपींनी महामार्गावरील प्रवाशांना दुखापत होईल अशा पद्धतीने महामार्गावरील रस्ता खणुन त्यात ड्रेनेज पाईप टाकले होते. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. ती **निशाणी क्र.२४** वर आहे.

३. दुस-या दिवशी पंचनामा करण्याकामी पोलिस घटनास्थळी आले होते. त्यावेळी मी त्यांना घटनास्थळ दाखवले होते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.एम. वाय. शिंदे -**

**४.** हे म्हणणे खरे आहे की, मी राज्य अथवा केंद्र शासकीय कर्मचारी नाही. मी पुणे सातारा महामार्गावर रुट ऑपरेशन मॅनेजर म्हणुन आनेवाडी टोल नाका येथे कार्यरत असल्याबाबतचे कागदपत्र पोलिसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद नि.क्र.२४ मध्ये नमुद इसम गोविंद यास मी पुर्वी ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, कथीत तोडफोड कोणी केली व ड्रेनेज पाईप कोणी टाकले याबाबत मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे ती कथीत तोडफोड नेमकी कोणी केली व ते पाईप कोणी टाकले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत पंचनामा कार्यवाहीच्या वेळी तलाठी अथवा नगर भुमापन विभागाचे अधिकारी अथवा कर्मचारी तेथे हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांकाची नोंद ही तलाठी कार्यालयाच्या अखत्यारीतील आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळा वरील जागेचे गट क्रमांक नेमके कोणते होते ते मला आजरोजी सांगात येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की कथीत घटनास्थळाच्या शेजारील जागेचे कोणकोण मालक आहेत हे मला आजरोजी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री बी. जे. शर्मा यांनी मला फिर्याद देण्याबाबत कोणतेही लेखी आदेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळावरील महामार्गाचा माझ्याशी तसेच श्री बी. जे. शर्मा यांच्याशी काहीही संबध नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळावरील महामार्गाची मालकी पी एस टोल यांच्याकडे नव्हती.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सदरची फिर्याद दाखल करण्याचा कोणताही अधिकार नसताना मी प्रस्तुतची खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.08.13 10:33:58 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- १२.०८.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई